# प्रकरण पाचवे

# समारोप

# प्रकरण पाचवे

## समारोप

कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्रातील एक औद्योगिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक दृष्टया प्रगत जिल्हा म्हणून सर्व देशात प्रसिध्द आहे. कोल्हापूर हे पूर्वी एक मराठी संस्थान होते. ते छ. शिवाजी महाराजांचे वंशज - वंशपरंपरेने चालवित होते. १९४९ पर्यंत येथे छत्रपतींची संस्थांनी राजवट होती. १९४९ मध्ये कोल्हापूर संस्थान मुंबई प्रांतात विलीन होऊन कोल्हापूर एक जिल्हा म्हणून अस्तित्वात आला.

१९४७ नंतर शे.का. पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पक्ष इ. डावे पक्षानी, श्रमजीवी, कष्टकरी, गरीब जनतेसाठी महत्वाचे कार्य, कोल्हापूरात केलेले आहे. भा.शे.का. पक्ष कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया आणि समाज वादी पक्ष हे डावे पक्ष म्हणून समजले जातात. आणि भारतीय जनता पक्ष, स्वराज्य पक्ष हे उजवे पक्ष समजले जातात. तर काँग्रेस हा मध्यवर्ती पक्ष म्हणून ओळखला जातो. शे.का. पक्ष स्थापन झाल्यापासून कोल्हापूर जिल्हा हा शे.का. पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. व आजही जात आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात १९४८ पूर्वी पासून सुध्दा म्हणजे संस्थान काळात सुध्दा लोकांनी इंग्रजांच्या विरूध्द इंग्रजांच्या विरूध्द उठाव करून आपली अस्मिता दाखवून दिली होती.

१९३८-३९ मध्ये शेतसारा कमी करण्यासाठी चळवळी झाल्या. त्यातूनच प्रजापरिषदेचा जन्म झाला. ह्या परिषदेने कोल्हापूरात चळवळीची प्रेरणा दिली. यावेळी कोल्हापूरात वेगवेगळया स्वरूपाचे मोर्चे काढले गेले. आणि शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर यांच्या मागण्या

---

मान्य करून घेतल्या.

१९४२ च्या चलेजाव चळवळीत दे.भ. रत्नाप्पा कुंभार व भाई माधवराव बागल यांनी प्रजा परिषदे तर्फे अनेक लोकहित कारक चळवळी चालू केल्या आणि कोल्हापूर संस्थानातील जनतेस न्याय मिळवून दिला.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. प्रजापरिषदेने छ. शहाजी महाराजांकडे जबाबदार राज्यपध्दती बाबत मागणी केली. त्यानुसार प्रजापरिषदेचे मंत्री मंडळ कोल्हापूर संस्थानात स्थापन झाले परंतु म. गांधीच्या खूनानंतर कोल्हापूर संस्थानातील जातीय दंगल उसळली त्यास प्रजापरिषद मंत्री मंडळ जबाबदार धरण्यात आले. कोयाजी कमिशनने बागल मंत्री मंडळास दोषी ठरविले आले आणि बरखास्त केले.

भारत स्वतंत्र झाले नंतर संस्थान विलीनकरणाची मोहिम सुरू झाली. कोल्हापूर संस्थान १ मार्च, १९४९ रोजी मुंबई प्रातांत विलीन झाले. कोल्हापूर संस्थान विलीन करण्यास शे.का. पक्षाने पाठिंबा दिला होता. त्याप्रमाणे जाहीर पत्रक ही प्रसिध्द केले होते. कोल्हापूर संस्थान विलीन झाले, नंतर कोल्हापूर हा मुंबई प्रातांचा एक जिल्हा बनला. प्रजापरिषदेचे विसर्जन झाले आणि प्रजा परिषदेचे कांही पुढारी कॉंग्रेसमध्ये तर बहुतांशी कार्यकर्ते नव्याने स्थापन झालेल्या शेतकरी कामगार पक्षात गेले आणि कोल्हापूर जिल्हा हा सुरवातीपासून म्हणजे १९४८ पासून शे.का. पक्षाचा बालेकिल्ला बनला.

शेतकरी कामगार पक्षाची स्थापना १९४८ साली झाली. पूर्वी कॉंग्रेसच्या अंतर्गत शेतकरी, कामगार, यांच्यासाठी काम करणारा तो एक गट होता. कॉंग्रेसमधून बाहेर पडून तो एक स्वतंत्र पक्ष म्हणून स्थापन झाला.

शे.का. पक्षाने आपल्या पक्ष संघटनेची कांही कलमे केलेली आहेत.

---

१. कलम नं. १ :- या संघटनेचे नांव भारतीय शेतकरी कामगार पक्ष असे राहील. तथापि पक्षाच्या राज्य शाखांना त्या त्या प्रादेशिक भाषेत पक्षाचे भाषांतरीत नांव वापरण्याची मुभा राहील.

२. कलम नं. २ :- पक्षाचा झेंडा लाल रंगाचा राहील व त्याच्या लांबी रूंदीचे प्रमाण ३:२ असे राहील. पक्षाच्या झेंडयावर मध्यभागी हातोडा व विळा यांचे चिन्ह राहील आणि डाव्या बाजूच्या वरच्या कोप-यावर पंचरेषाकृती तीन तारे राहतील. वर्तुळामध्ये कोरलेला हातोडा व विळा आणि पंचरेषाकृती तीन तारे हे पक्षाचे बोधचिन्ह राहील.

३. कलम नं. ३ :- पक्षाची मध्यवर्ती समिती ठरवील त्या ठिकाणी पक्षाची मध्यवर्ती कचेरी राहील.

ह्या शे.का. पक्षाने कोल्हापूर जिल्ह्यात १९४८ पासून आपल्या कार्याला सुरवात केली व नगरपालिका, डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड, आमदार, खासदार, निवडून आणून श्रमजीवी, कष्टकरी व शेतकरी, मजूर कामगार ह्या वर्गासाठी वेगवेगळया स्तरावर लढे उभारले प्रसंगी कारावासही भोगले. गोळीबाराला तोंड दिले. पण श्रमजीवी, कष्टकरी, कामकरी, ह्या वर्गासाठी काम करण्याचे धोरण त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी पक्षाने कार्य केलेले आहे. कांही वेळा ह्या पक्षाला यशही आले व कांही वेळा अपयशही आले. पण कष्टकरी गरीब जनतेची बाजू सोडलेली नाही. आजही हा पक्ष तितक्याच जोमाने कार्य करताना दिसत आहे.

शे.का. पक्षाने १९४८ ते १९९० पर्यंत कोल्हापूर जिल्ह्यात भरीव काम केले. डाव्या विचार सरणीस अनुसरून त्यांनी १९५२,१९५७, १९६२, १९६७, १९७२, १९७८, १९८०, १९८५, १९९० पर्यंत निवडणुका लढविल्या. मुंबई प्रातांच्या १९५२ व १९५७ च्या विधान सभा निवडणुकीत कोल्हापूर जिल्ह्यातून व कोल्हापूर शहरातून

---

शे.का. पक्षाला चांगले यश मिळाले होते. १९५७ ला तर कोल्हापूर शहरातून आमदार पी.बी. साळुंखे हे शे.का. पक्षाच्या तिकीटावर निवडून आले होते, तर १९५७ ला कोल्हापूर लोकसभा मतदार संघातून शे.का. पक्षाचे भाऊसाहेब महागांवकर हे खासदार म्हणून निवडून आले होते. तसेच कागल, शाहुवाडी, मधूनही ६ शे.का. पक्षाचे उमेदवार विधान सभेवर निवडून गेले होते. ह्यावरून शे.का. पक्षाच्या विचाराला व कार्याला कोल्हापूर जिल्ह्यातील जनतेने भरघोस पाठिंबा दिला होता. हे निश्चितच शिवाय शे.का. पक्षाने ह्या काळात महागाई, वाढीव शेतसारा गिरणी कामगारांचे प्रश्न इ. प्रश्नावर अनेक वेळा कोल्हापूरात व तहसिलदार कचे-यावर निदर्शने, मोर्चे काढलेले दिसतात आणि श्रमजीवी, कष्टकरी लोकांची गा-हाणी शासनापुढे मांडून न्याय मिळवून दिलेला दिसतो. हा श्रमजीवी लढा १९६२ नंतर अखंडपणे पुढे चालू ठेवलेला होता व आजही चालू आहे.

शे.का. पक्षाने १९६२ ची सार्वजनिक विधान सभा निवडणुक लढविली. १९५७ शे.का. पक्षाच्या कोल्हापूर शहर मतदार संघातून निवडून आलेले पी.बी. साळुंखे हे यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई यांच्या आवाहनानुसार कॉंग्रेसमध्ये सामील झाले. त्यामुळे १९६२ ची विधान सभेची उमेदवारी ही त्र्यं.सी. कारखानीस ह्यांना दिली. व ते विजयी झाले. व कॉंग्रेसचे पी.बी. साळुंखे पराभूत झाले. पून्हा १९६७ व १९७२ च्या निवडणुकीतून सुध्दा कोल्हापूर शहर मतदार संघातून शे.का. पक्षाचे त्र्यं.सी. कारखानीस हे विजयी झाले. त्याच बरोबर १९६३ ते १९९० पर्यंत शे.का. पक्षाने महागाई विरोधी निदर्शने संप, मोर्चे काढलेले दिसतात. त्यात त्यांना कधी यश तर कधी अपयश आले परंतु हा लढा त्यांनी चालूच ठेवला. नेहमीच कष्टकरी, दीन-दुबळयांची बाजू घेऊन अनेक आंदोलने केली. या काळात पक्षाच्या प्रगतीसाठी शिबीरे, संम्मेलने, मिटींग्ज, अनेक वेळा घेतलेल्या आहेत. आणि आजही डावी विचार सरणी कोल्हापूर

---

जिह्यात तळागाळा पर्यंत पाहोचविण्याचे काम या पक्षाने केलेले आहे.

सद्या ह्या पक्षाच्या कांही संस्थापक सदस्यांचे निधन झालेले आहे. त्या ठिकाणी आज नविन तरूण वर्ग पक्षाचे काम करतो आहे. आणि कोल्हापूर जिल्हयात विशेषत: कोल्हापूर शहरात शे.का. पक्षाचे कार्यकर्ते, अनुयायी, आजही आपल्याला पक्षाचे कार्य करताना दिसतात.

आम. पी.बी. साळुंखे हे १९६२ पर्यंत शे.का. पक्षाचे शहरातील आमदार होते. तर १९६२ पासून जवळ जवळ तीन निवडणुका शहरातून शे.का. पक्षाच्या तिकिटावर लढून कोल्हापूरचे आमदार होते. पुढे १९८५ ला शे.का. पक्षाच्या तिकिटावर कोल्हापूर शहरातून प्रा.एन.डी. पाटील निवडुण आले. आणि शहराचे नेतृत्व केले. यांच्या व्यतिरिक्त शाहूवाडी मतदार संघातून राऊ धोंडी पाटील, कागल मधून विमलाबाई बागल चंदगड मधून नरसिंग भुजिंगा पाटील सांगरूळ गोविदराव कलिकते, शिरोळ मधून दिनकरराव यादव यांनी शे.का. पक्षाचे कोल्हापूर जिल्ह्यातील आमदार म्हणून विधान सभेत निवडुण येऊन भरीव काम केलेले दिसते. शे.का. पक्षाचे खासदार म्हणून भाऊसाहेब महागावकर (१९५७) आणि विजयमाला राणीसाहेब (१९६७) साली लोसभेत पक्षाचे कार्य केले होते. पुढे १९७७ ला लोक सभेवर कोल्हापूर लोकसभा मतदार संघातून शे.का. पक्षाचे दाजिबा देसाई हे निवडून आले होते. आणि लोकसभेत कोल्हापूरचे प्रतिनिधित्व केले होते.

१९८५ ला कोल्हापूर शहरातून प्रा. एन. डी. पाटील शे.का. पक्षाच्या तिकिटावर निवडणुक आले. मात्र १९९० नंतर कोल्हापूर शहरातील विधानसभेची जागा शिवसेनेकडे गेली आणि शे.का. पक्षाचे अस्तित्व १९९० नंतर कमी कमी होऊ लागले.

१९४८ ते १९९० पर्यंत शे.का. पक्षाच्या वाढीस अनेक नेते व कार्यकर्ते कार्य करत होते. भाई दाजिबा देसाई, माधवराव बागल, हिंदूराव साळुंखे, आनंदराव साळुंखे,

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रा.एन.डी. पाटील, प्रा. विष्णूपंत इंगवले, सुनंदा मोरे, बाबासाहेब देसाई, मोहनराव जाधव, काका राऊत, आण्णसाहेब चव्हाण, टी.एस. कारखानीस, गोविंदराव कलिकते, राऊ धोंडी पाटील, दिनकरराव यादव, संपत पवार - पाटील, नरसिंग भुजिंगा पाटील, डी.एस. नार्वेकर आणि असंख्य कार्यकर्त्यांनी शे.का. पक्षाचे कार्य कोल्हापूर जिल्हयात केले. म्हणूनच कोल्हापूर जिल्हा हा शे.का. पक्षाचा बालेकिल्ला बनला. पण १९९० पासून पुढे या पक्षातले संस्थापक सदस्य कमी होऊ लागले. आणि १९४८ ला जो जोम या पक्षात दिसत होता तो १९९० नंतर थोडा कमी झालेला दिसतो.

शे.का. पक्षा प्रमाणेच दुसरा डावा पक्ष म्हणजे कम्युनिस्ट पक्ष होय. कोल्हापूर जिल्ह्यात शे.का. पक्षा प्रमाणे कम्युनिस्ट पक्षाने देखील कष्टकरी जनतेसाठी भरीव काम केलेले आहे. गोविंदराव पानसरे, संतराम पाटील, अकोळकर, प्राचार्य ए.ए. पाटील, के.एल. मलाबादे, एस. पी. पाटील, सूर्याजी साळुंखे, इत्यादि आणि अनेक कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यात भरीव कार्य केले आणि कामगार वर्गाला त्याचा न्याय मागण्या मान्य करून घेतल्या. लाल बावटया सारख्या कामगारांच्या युनियन काढल्या. त्याद्वारे संप, हरताळ, मोर्चे, काढले. १९७८ च्या विधानसभेच्या निवडणुकीत इचलकरंजी मतदार संघातून कम्युनिस्ट पक्षाचे शिवगोंडा पिरगोंडा पाटील हे विजयी झाले होते. आणि कम्युनिस्ट आमदार म्हणून त्यांनी पांच वर्षे कष्टकरी कामगारांची बाजू हिरीरीने मांडली तर, १९९० च्या सार्वत्रिक निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे के. एल. मलाबादे हे इचलकरंजी विधान सभा मतदार संघातून निवडणून आले होते. कोल्हापूर प्रमाणे इचलकरंजी शहरात कम्युनिस्ट पक्षाचे कार्य जोरात सुरू आहे.

थोडक्यात शे.का. पक्ष आणि कम्युनिस्ट पक्ष हे कोल्हापूर जिल्ह्यात श्रमजीवी

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

जनतेचे प्रश्न सोडवित आहेत. हे दोन पक्ष डाव्या विचार सरणीचे आहेत. आज अर्थिक प्रश्न महत्वाचे आहेत. जगात श्रमजिवी गरीब आणि श्रीमंत असे वर्ग आहेत. भांडवलशाही अर्थ व्यवस्था ही गरीब जनतेच्या जाचक व तिची पिळवणुक करणारी आहे. या जाचक अर्थ व्यवस्थेतून कष्टकरी जनतेची मुक्तता शे.का. पक्ष आणि कम्युनिस्ट पक्ष करू शकेल अशी आशा वाटते. म्हणून हा शोध प्रबंध मार्गदर्शक वाटेल अशी खात्री वाटते.

---